MHKO100006132013

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १९०/२०१३ मधील**
**निशाणी क्र. ५२ वरील आदेश**

१. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी यांचे वतीने उलटतपास घेणेवर नेमले होते. प्रस्तुत प्रतिवादी यांना योग्य ती कागदपत्रे व माहिती न मिळालेने त्यांचा उलटतपास घेता आला नाही. प्रतिवादी यांनी उलटतपास घेणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी हे वादीचा उलटतपास घेणेस तयार आहेत. सबब अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे. त्याचे म्हणणे असे आहे की, प्रस्तुत कामी बरेच दिवसापुर्वी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यावेळेपासून वादीचे उलटतपासासाठी काम प्रलंबित आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना उलटतपासाची संधी देणेचे झालेस रुपये ३०००/— खर्च बसविणेत यावा असे कळविले आहे.

४. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांनी अर्ज व म्हणण्याच्या मजकुराप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

५. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांच्या विरुध्द हक्कज्ञापनासाठी, सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेकरीता व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक २१/११/२०१७ रोजी दाखल केलेले आहे. त्यानंतर दिनांक ०६/०१/२०२३ रोजी प्रतिवादी यांचे विरुध्द ''उलटतपास नाहीचा'' आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज आजरोजी दाखल केलेला आहे. वादी यांनी सदरचा दावा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व हक्कज्ञापनाकरीता दाखल केला असल्यामुळे प्रतिवादी यांना पुरावा करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द झालेला ''उलटतपास नाहीचा'' आदेश रद्द न केलेस त्यांना न्याय्य हक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या कथनावर अविश्वास ठेवणेसारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. सबब दावा स्थावर मिळकतीबाबत असलेने व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे अर्जातील कथनाचा विचार करता त्यांचे विरुध्द झालेला ''उलटतपास नाहीचा'' आदेश रद्द करुन व त्यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांचेवर खर्च बसवून त्यांना वादीचा उलटतपास घेणेस परवानगी देणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी यांना रक्कम रुपये ३००/— (अक्षरी रुपये तीनशे मात्र) पुढील तारखेपुर्वी अथवा पुढील तारखेदिवशी खर्च देण्याच्या अटीवर प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला ''उलटतपास नाहीचा'' आदेश रद्द करुन प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. सदरचे प्रकरण हे जुने असलेने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी यांना उपरोक्त नमुद खर्चाची रक्कम वर नमुद मुदतीत न दिलेस सदरचा आदेश आपोआप रद्द समजणेत यावा.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर वादी यांचा उलटतपास पुढील तारखेस न चुकता घेणेचा आहे असे त्यांना आदेशित करणेत येते.

DHANASHRI MAHADEV PAWAR

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.07.17 11:17:07 +0530

ठिकाण – गडहिंग्लज.
दिनांक – १५/०७/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.